अनुक्रमणिका

अ.नं.	तपशील	पृष्ठ क्रमांक
1	मा. महापौरांचे निवेदन	39-42
2	मा. स्थायी समिती सभापतींचे निवेदन	43-44
3	मा. आयुक्तांचे निवेदन	45-63
4	जमा / खर्चाचे आलेख	64-72
5	महसुली व भांडवली जमा गोषवारा	73 - 74
6	महसुली व भांडवली खर्च गोषवारा	75-77
भाग- एक	**''अ'' अंदाजपत्रक**	**78-165**
7	"अ" महसुली जमा	78-97
8	"अ" महसुली जमा अनुदाने	88-89
9	"अ" भांडवली जमा	98
10	"अ" भांडवली जमा अनुदाने	98
11	"अ" महसुली खर्च	100-148
12	"अ" भांडवली खर्च	150-165
भाग- दोन	**"क" अंदाजपत्रक**	**166-184**
13	"क" महसुली जमा	166-167
14	"क" भांडवली जमा	168
15	"क" भांडवली जमा अनुदाने	168
16	"क" महसुली खर्च	169-179
17	"क" भांडवली खर्च	180-184
भाग- तीन	**"प" अंदाजपत्रक**	**185-195**
18	"प" महसुली जमा	185-186
19	"प" महसुली जमा अनुदाने	186
20	"प" भांडवली जमा	187
21	"प" भांडवली जमा अनुदाने	187
22	"प" महसुली खर्च	188-194
23	"प" भांडवली खर्च	195
भाग-चार	**राखीव निधी व जिल्हा/राज्य/केंद्र शासकीय योजना**	**196-237**
24	राखीव निधी	196-222
25	जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण अभियान	223-235
26	अमृत योजना	236-237
भाग-पाच	**कर्ज दायित्वे**	**238**
भाग-सहा	**भांडवली कामे**	**239-411**
27	भांडवली कामांचा गोषवारा	239-243
28	भांडवली कामांच्या याद्या (अ, ब, क, ड, इ)	244-411
29	मा. स्थायी समिती ठराव	412-429
30	मा. महासभा ठराव	430-476
31	वृक्ष प्राधिकरण अंदाजपत्रक ठराव	477-478

नाशिक महानगरपालिका नाशिक
सन 2019-2020 चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक अ, क आणि प बाबत
मा. महापौर यांचे निवेदन

फोटो

नाशिक महानगरपालिकेच्या सहाव्या पंचवार्षिक मधील पहिल्या सत्राच्या कालावधी करीता महापौर तथा प्रथम नागरीक होण्याची संधी मिळाली.

मुंबई-पूणे-नाशिक या सुवर्ण त्रिकोणातील नाशिक शहर आणि पूर्वीपासून धार्मिक, ऐतिहासिकतेचे शहर म्हणून ओळख असल्याने सातत्याने शहराचा नागरी विकास झपाटयाने होत आहे. नागरी विकास कामांसाठी या अर्थसंकल्पात पुरेशी अशी तरतूद करण्यात आली आहे.

नाशिककरांच्या विश्वासाला सार्थ ठरणारा अशा प्रकारचा अर्थसंकल्प तयार केलेला असून नाशिकचा विकास, प्रगती आणि उज्वल नांव या बाबी प्राकर्षाने लक्षात घेऊन कामांसाठी प्रत्यक्षात कृती करणे ही बाब अतिशय महत्वाची आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या सन 2019-2020 च्या अंदाजपत्रकावर ब-याच सन्माननीय सदस्यांनी अतिशय मौलीक अशा सुचना मांडल्यात. यासर्व सुचनांचा विचार करता प्रामुख्याने चालू आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या उत्पन्नापासून संभावित जमा व प्रलंबित अनुदाने प्राप्त करुन त्यातून उपलब्ध होणारा निधी आणि या उपलब्ध होणा-या निधीतून बांधील खर्च वजा जाता उर्वरित रक्कम ही नागरीहिताच्या कामांसाठी उपलब्ध होणार आहे. कमी अधिक प्रमाणात बांधील खर्चात वाढ होत असल्याने दिवसेंदिवस नागरी कामासाठी निधी मर्यादित स्वरुपात उपलब्ध होत आहे. तेव्हा सध्याच्या उत्पन्न मार्गाव्यतिरीक्त उत्पन्न वाढीच्या अन्य मार्गांचाही विचार करणे याचबरोबर बांधील खर्चाचे प्रमाण कमीत कमी कसे राहील यासाठी देखील विचार करणे गरजेचे झाले आहे.

नाशिक शहराच्या कक्षा सातत्याने रुंदावत आहेत त्यामुळे नागरी सुविधा, वाहतुक नियमनाच्या बाबतीतही वाढ होत आहे. त्याचबरोबर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी मनपाच्या मालकीच्या जागेत मोठया स्वरुपाची व्यापारी संकुले, वाहनतळे उभारल्यास त्या माध्यमातून कायमस्वरुपी उत्पन्न मिळेल. भूसंपादनासाठी मनपास मोठया स्वरुपात निधी खर्च करावा लागतो तेव्हा अशा भूसंपादीत जागेवरील वास्तू/जागा इ.च्या माध्यमातून मनपास मिळणा-या उत्पन्नातही वाढ होणेचे दृष्टीने प्रयत्न करणे क्रमप्राप्त झाले आहे.

प्रभागातील नागरी विकासाची कामे ही त्या-त्या सदस्यांनी प्रस्तावीत केली आहेत त्या व्यतिरीक्त नागरी विकासाची सार्वजनिक कामे यांचा देखील अर्थसंकल्पात समावेश करणे आणि त्यासाठी आर्थिक तरतूद करणे या गोष्टी क्रमप्राप्त आहेत. यात प्रामुख्याने शहराच्या विविध भागातील विविध योजनांसाठी आवश्यक ती तरतूद या अर्थसंकल्पात केलेली आहे.

नागरी विकासाच्या सर्व योजनांसाठी व प्रभागातील कामांसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध व्हावा यासाठी म्हणजेच उत्पन्न वाढीच्यादृष्टीने विशेष लक्ष देणेत येईल. त्याचप्रमाणे नागरिकांच्या आणि शहर विकासासाठी काही योजना/प्रकल्पांसाठी या अर्थसंकल्पात तरतूद केली त्यातील काही प्रकल्प/योजना पुढीलप्रमाणे -

1) नाटयगृहांची उभारणी - नाशिक येथील विविध सांस्कृतिक संस्था व कलाकार यांच्या मागणीनुसार नाशिक मनपा क्षेत्रात विविध ठिकाणी नाटयगृहांची उभारणी करण्याचे नियोजन आहे व त्यासाठी या अर्थसंकल्पात तरतूद करणेत आली आहे.
2) नाशिक शहरात प्रायोगिक तत्वावर नाशिक (पश्चिम) विभागात कृषीनगर येथे सुमारे 900 मीटर लांबीचा सायकल ट्रॅक विकसित करणेत येत आहे. याप्रमाणे उपयुक्तते नुसार इतर भागातही स्वतंत्र सायकल ट्रॅक विकसीत करणेत येईल. शहरातील अस्तित्वातील मुख्य रस्ते व नव्याने विकसित करावयाचे रस्ते या मध्ये सायकल ट्रॅक सह विकसीत करणेचा मानस आहे.
3) विदयार्थ्यांसाठी अभ्यासिका, वाचनालय उभारणी - विदयार्थ्यांना अभ्यासासाठी जागा उपलब्ध व्हावी व वाचनाची आवड निर्माण व्हावी या हेतूने मनपा क्षेत्रात अभ्यासिका वाचनालय उभारणेत येणार आहे त्यासाठी या अर्थसंकल्पात तरतूद करणेत आली आहे.
4) मनपा शाळा इमारत - महानगरपालिका शाळेच्या काही इमारती या जुन्या झाल्या असून तेथे नविन इमारत बांधणे विदयार्थ्यांच्या दृष्टीने आवश्यक असल्याने अशा शाळा इमारती बांधणेसाठी या अर्थसंकल्पात तरतूद करणेत आली आहे.
5) नाशिक सुकन्या योजना - भारतातील मुलींची घटती संख्या विचारात घेऊन मुलींचा जन्माचा दर वाढविण्याच्या दृष्टीने मा.केंद्र शासनाने बेटी बचाओ बेटी पढाओ या योजनेअंतर्गत सुकन्या योजना सुरु केली आहे. त्या धर्तीवर नाशिक महानगरपालिकेच्या क्षेत्रात मुलींचा जन्माचा दर वाढविण्याच्या दृष्टीने व मुलींची भ्रुण हत्या थांबविण्याच्या दृष्टीने तसेच मुलींचे भविष्य सुरक्षित होण्याच्या दृष्टीने नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये ज्या दाम्पत्यांना दोन मुली आहे व त्या मुलींवर त्यांनी कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केली आहे किंवा एका मुलीवर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केली आहे अशा दांम्पत्याला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने नाशिक महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत सुकन्या योजना सुरु करण्यात येत आहे. सुकन्या योजनेअंतर्गत त्यांचे मुलींच्या नांवे रक्कम रुपये 5,000/- 18 वर्षे वयापर्यंत फिक्स डिपॉझिटची पावती स्वरुपात देण्यात येईल.
6) नियमित करदात्यांसाठी अपघात विमा योजना – घरपट्टी, पाणीपट्टी सह विविध प्रकारच्या कराचा भरणा वेळच्या वेळी व्हावा व त्यास प्रोत्साहन मिळावे यासाठी नियमित कर भरणा-या मालमत्ताधारकांसाठी ही योजना सुरु करण्याचे नियोजन आहे.
7) पी.पी.पी. तत्वावर प्रकल्प राबविणे - नवीन नाशिक येथील पेलिकन पार्कच्या 17 एकर जागेवर सेंट्रल पार्क विकसित करणे व दादासाहेब फाळके स्मारक पीपीपी तत्वावर विकसीत करणेचे नियोजन आहे.
8) व्यायामशाळा - युवकांमध्ये शिक्षणाबरोबर शरीर बळकट व निरोगी राहण्यासाठी व्यायामाची आवड निर्माण व्हावी व ते प्रत्यक्षात आणण्यासाठी मनपा क्षेत्रात व्यायामशाळा बांधणेसाठी या अर्थसंकल्पात तरतूद करणेत आली आहे.

9) "स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत नविन सामुदायिक शौचालये व घरगुती शौचालये उभारुन तसेच सद्यस्थितीत उपलब्ध असलेली शौचालये दुरुस्त करुन नाशिक शहर हागणदारीमुक्त (ओ.डी.फ्री) करण्यात आले आहे.

10) उद्यानात नविन खेळणी, बेंचेस व ग्रीन जीम साहित्य बसविणे - लहान मुलांसाठी खेळणी, वृध्दांसाठी बेंचेस व युवकांसाठी ग्रीन जीम साहित्य मनपा क्षेत्रातील उद्यानात बसविणेसाठी या अर्थसंकल्पात तरतूद करणेत आली आहे.

11) विद्यार्थ्यांना अत्याधुनिक पध्दतीने शिक्षण देण्यासाठी 90 मनपा शाळांमध्ये संगणक पूरवून त्या डिजीटल करणेसाठी तसेच विदयार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागून त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळण्याच्या दृष्टीने सर्व मनपा शाळांमधील विज्ञान साहित्यासह प्रयोगशाळा अद्यायावत करणेकामी अर्थसंकल्पात तरतूद करणेत आली आहे.

12) जलकुंभ बांधणे - जलदाय व्यवस्था- नाशिक मनपा क्षेत्रात विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय करणेकामी जलकुंभ बांधणेकरीता या अर्थसंकल्पात तरतूद करणेत आली आहे.

13) पथदिप विद्युतीकरण - नाशिक मनपा क्षेत्रातील सर्व प्रभागांमध्ये एल.ई.डी.पथदीप व्यवस्था करणेसाठी या अर्थसंकल्पात तरतूद करणेत आली आहे.

14) नदी संवर्धन - नाशिक मनपा क्षेत्रातून वाहणा-या गोदावरी नदी, नंदिनी (नासर्डी नदी) वाघाडी नदी तसेच वालदेवी नदी यांचे स्वच्छता व सुशोभिकरणाबाबत या अर्थसंकल्पात तरतूद करणेत आली आहे.

15) खेडयांचा विकास - नाशिक महानगरपालिकेत अंतर्भुत असलेल्या ग्रामीण भागाचा विचार करुन त्या सर्व ग्रामीण भागाचा विकास व्हावा या हेतूने खेडयांच्या सर्वांगीण विकासासाठी या अर्थसंकल्पात तरतूद करणेत आली आहे.

16) लोककल्याण पुरस्कार - उत्कृष्ट कार्य करणा-या नागरिकांना लोककल्याण पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

17) महिला उद्योग भवन – मनपाच्या सहाही विभागात महिला उद्योग भवन विकसीत करणेचे नियोजन आहे.

18) महानगरपालिका कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग - महानगरपालिकेच्या कार्यरत कर्मचा-यांसह निवृत्त कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग तातडीने लागू करण्याचा निर्णय घेणेत आला असून त्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करणेत आलेली आहे.

19) वृक्ष लागवड व संवर्धन - नाशिक मनपा क्षेत्रात पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी व वृक्ष लागवडीचे ध्येय साध्य करण्याकामी वृक्ष लागवड व संवर्धनासाठी या अर्थसंकल्पात तरतूद करणेत आली आहे.

20) मनपा दवाखाने, रुग्णालये - नाशिक शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता शहरातील मनपा चे दवाखाने,रुग्णालये अद्यायावत करणे, शहरी गरीबांसाठी औषधे खरेदी योजना राबविणेसाठी या अर्थसंकल्पात तरतूद करणेत आली आहे.

नाशिक महानगरपालिकेचे सन 2019-2020 चा अर्थसंकल्प तयार करतांना देशाचे पंतप्रधान आदरणीय श्री. नरेंद्रजी मोदी, भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री.अमितजी शाह, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस, भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा. खा. श्री. रावसाहेब दानवे, महाराष्ट्र राज्याचे वैदयकिय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री तथा पालकमंत्री नाशिक मा. ना. श्री. गिरीषजी महाजन, संघटन मंत्री मा. श्री. किशोरजी काळकर, मा. खा. श्री. हरिश्चंद्र चव्हाण, शहराध्यक्ष मा. आ. श्री.

बाळासाहेब सानप, मा. आ. प्रा. सौ. देवयानी फरांदे, मा. आ. सौ. सिमाताई हिरे यांचे सहकार्य लाभले तसेच उपमहापौर मा. श्री. प्रथमेश गिते, स्थायी समिती सभापती मा. हिमगौरी बाळासाहेब आहेर, मा. आयुक्त श्री. राधाकृष्ण गमे, सभागृह नेते मा. श्री. दिनकर पाटील, विरोधी पक्षनेते मा. श्री. अजय बोरस्ते, भाजपा गटनेते मा. श्री. संभाजी मोरुस्कर, शिवसेना गटनेते मा. श्री. विलास शिंदे, काँग्रेस गटनेते मा. श्री. शाहु खैरे, राष्ट्रवादी काँग्रेस गटनेते मा. श्री. गजानन शेलार, महाराष्ट्र नवनिर्माण सेना गटनेते मा. श्री. सलिम शेख, आर.पी.आय. (अे) गटनेते मा. सौ. दिक्षाताई लोंढे तसेच मनपा पदाधिकारी तसेच सर्व पक्षांचे जेष्ठ पदाधिकारी मनपा सभागृहातील सर्व सदस्य, शहरातील विकास कामासाठी कार्यरत असलेल्या विविध संघटना आणि त्यांचे पदाधिकारी, सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते, सर्व वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्यांचे संपादक, पत्रकार, छायाचित्रकार, प्रतिनिधी तसेच नाशिक महानगरपालिकेतील सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग यांचे नाशिक शहराच्या विकासाच्या दृष्टीने मला मार्गदर्शन लाभत आहे.

महानगरपालिकेची ध्येय, धोरणे प्रत्यक्षात राबविणेकामी निश्चितच मला सर्वांचे सहकार्य आहे. त्याचप्रमाणे, शहरातील नागरिकांचे प्रेम, सदिच्छा आणि सातत्याने सहकार्य असल्यामुळे या शहराच्या विकासासाठी जास्तीत जास्त वेळ काम करण्याकरिता प्रोत्साहन मिळत आहे. तसेच ते भविष्यातही मिळेल अशी आशा व्यक्त करते आणि माझे निवेदन पूर्ण करते.

जय हिंद!! जय महाराष्ट्र!!

(सौ. रंजना पोपट भानसी)
महापौर,
नाशिक महानगरपालिका नाशिक

नाशिक महानगरपालिका, नाशिक

सन 2018-19 चे सुधारीत व सन 2019-20 चे मूळ अंदाजपत्रक

महापालिका आयुक्तांचे निवेदन

सन्माननीय सभापती, स्थायी समितीचे सर्व सन्माननीय सदस्य व पत्रकार बंधू भगिनींनो..

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-95 अन्वये, नाशिक महापालिकेच्या जमा - खर्चाचे सन 2018-19 चे सुधारीत व 2019-20 चे मूळ अंदाज मा. स्थायी समितीस सादर करीत आहे. सदर अंदाज तयार करत असतांना, महापालिकेस प्राप्त होणारे विविध कर, शुल्क, फी, अनुदाने व अन्य जमा लक्षात घेऊन, मनपा कार्यक्षेत्रात करावयाची विकास कामे व पुरवावयाच्या सेवांसाठी होणा-या खर्चाचा प्राधान्यक्रम ठरवून योग्य ताळमेळ घालणेचा प्रयत्न केलेला आहे.

शहरातील रस्ते, पदपथ, उड्डाणपूल, जलवाहिन्या, मलनि:स्सारण वाहिन्या, विद्युतीकरण, उद्यानविकास, परिवहन, शिक्षण, वैद्यकिय सेवा, घनकचरा व्यवस्थापन, इ. नागरी सुविधांची पूर्तता करतांना समतोल विकासाचा विचार करण्यात आला आहे. रहिवासी तरुण, प्रौढ, महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, दलित, उद्योजक, नोकरदार अशा सर्वच घटकांना अपेक्षित सेवा-सुविधांची दर्जात्मक पूर्तता करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. तसेच ई-गव्हर्नन्सचा प्रभावी वापर करुन, सुलभ, पारदर्शक व गतिमान प्रशासकीय कामकाज करण्यावर भर देण्यात येत आहे.

सन 2018-19 चे सुधारीत अंदाजपत्रक

सन 2018-19 च्या मंजूर अर्थसंकल्पानुसार नोव्हेंबर 2018 पर्यंतच्या आठमाही कालावधीत प्रत्यक्ष जमा झालेला महसूल व करण्यात आलेल्या खर्चाचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच उर्वरित चार महिन्यांच्या कालावधीत प्राप्त होणारी जमा आणि विकास कामावरील खर्च गृहित धरुन, सन 2018-19 चे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यानुसार रु. 298.12 कोटी (रुपये दोनशे अठ्ठयान्नऊ कोटी बारा लक्ष) आरंभीच्या शिल्लकेसह, रु.1659.17 कोटी (रुपये एक हजार सहाशे एकोणसाठ कोटी सतरा लक्ष) जमा व रु.1431.25 कोटी (रुपये एक हजार चारशे एकतीस कोटी पंचवीस लक्ष) खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक सादर करण्यात येत आहे. तसेच सन 2018-19 च्या सुधारित अंदाजपत्रकानुसार अखेरची शिल्लक रु. 227.92 कोटी (रु. दोनशे सत्तावीस कोटी ब्यान्नऊ लक्ष) दर्शविण्यात आलेली आहे.

सन 2019-20 चे मूळ अंदाजपत्रक

सन 2019-20 या वर्षाचे अंदाज तयार करतांना, यापूर्वी हाती घेतलेल्या कामांचे दायित्व व जमा होणारा महसूल याचा वास्तववादी विचार करुन, जमा-खर्चाचे अंदाज तयार करण्यात आले आहेत.

- उत्पन्नाच्या बाबी -

महापालिकेच्या महसुलामध्ये प्रामुख्याने जीएसटी अनुदान, मालमत्ता कर, नगररचना शुल्क व पाणीपट्टी यांचा समावेश आहे. तसेच मालमत्ता उपयोगिता, विविध सेवा व अन्य साधनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नांचा समावेश आहे.

जीएसटी/स्थानिक संस्था कर :

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-चार क्र.55 अन्वये वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे, महापालिका कार्यक्षेत्रातील जकात व स्थानिक संस्था कर रद्द करुन त्याच्या भरपाईपोटी जीएसटी अनुदान देण्याचे धोरण शासनाने निश्चित केले आहे. त्यानुसार सद्यस्थितीत दरमहा रु. 72.83 कोटी अनुदान (वार्षिक रु. 873.96 कोटी) प्राप्त होत आहे. सन 2019-20 करीता त्यामध्ये 8% वाढ गृहीत धरुन रु. 943.87 कोटी अनुदान प्राप्त होऊ शकेल. तसेच पुढील वर्षी शासनाकडून 1% मुद्रांक शुल्क अनुदानापोटी रु. 60.00 कोटी प्राप्त होऊ शकतील. त्याचप्रमाणे सन 2019-20 या आर्थिक वर्षामध्ये प्रलंबित स्थानिक संस्था करनिर्धारणाचे काम पूर्ण करण्यात येणार असून, त्याद्वारे वार्षिक स्थानिक संस्था कर उत्पन्नात रु. 3.00 कोटी वाढ होण्याची शक्यता आहे.

उपरोक्तप्रमाणे सन २०१९-२० मध्ये महानगरपालिकेस अंदाजे रु. 1007.03 कोटी इतके उत्पन्न प्राप्त होईल.

मालमत्ता कर :

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्तांचे अचूक व पूर्ण करनिर्धारण करणे आवश्यक आहे. शहरातील कोणतीही मालमत्ता कर आकारणीविना राहू नये, याद्दष्टीने मालमत्ता सर्वेक्षणाचे काम हाती घेतले असून, सर्व मिळकतींचे जी.आय.एस. मॅपिंग करण्यात येत आहे. सद्यस्थितीत 4,79,600 मिळकतींच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे. तसेच नव्याने आढळून आलेल्या मिळकतींवर मालमत्ता कर लागू करणेची कार्यवाही सुरू आहे. जुन्या व नव्याने कर लागू होणा-या मिळकतींमधील वापरबदल, वाढीव बांधकामे, भाडेपट्टा इ. साठी वाढीव मालमत्ता कर लागू करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सर्वेक्षणातील नवीन मिळकतींच्या भोगवटादारांना विशेष नोटीसा देण्यात येत आहेत. तसेच प्राप्त होणा-या हरकतींवर निर्णय घेण्यात येत आहे.

मालमत्ता कराच्या सुलभ भरण्यासाठी महापालिकेच्या २२ नागरी सुविधा केंद्रांमध्ये रोख, धनादेश, क्रेडिटकार्ड, डेबिटकार्ड यांद्वारे कर भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. www.nmctax.in या संकेतस्थळावर तसेच NMC e-Connect मोबाईल ॲपवर नेटबँकिंगद्वारे ऑनलाईन कर भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच मालमत्ताकर थकबाकी ना-हरकत दाखला, मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र, वारसा हक्क मालमत्ता हस्तांतरण प्रमाणपत्र, डिमांड उतारा, रिव्हीजन उतारा या ई-सेवा नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

महापालिकेच्या मालमत्ता कर जमा महसूलापैकी शासनास परतावा करावयाचे उपकर/फी वगळता, सन २०१९ मध्ये २०-मालमत्ता करापासून अंदाजे रु. 218.86 कोटी निव्वळ उत्पन्न प्राप्त करण्याचे उद्दीष्ट ठरविण्यात आले आहे.

<u>नगररचना शुल्क :</u>

नगररचना विभागामार्फत प्रामुख्याने बांधकाम परवानगी, भोगवटा दाखला, तात्पुरता/अंतिम अभिन्यांस व झोनिंग दाखला या सेवांकरिता शुल्क आकारणी करण्यात येते. नाशिक शहराच्या विकास योजना आराखडयास मंजूरी प्राप्त असून, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली देखील मंजूर झालेली आहे. त्याअन्वये अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (Premium Paid FSI), तसेच रस्ता रुंदीनुसार वाढीव टीडीआर व वाढीव एफ.एस.आय. अनुज्ञेय असून, टीडीआर वापरा करिता 5% पायाभूत सुविधा शुल्क लागू करण्यात आले आहे.

टीडीआर व वाढीव एफ.एस.आय.मुळे कमाल इमारत क्षमता वाढणार असल्याने उत्पन्नवाढीस मदत होणार आहे. तसेच शासन निर्णय दि.7/10/2017 आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 मधील कलम-52(क) अन्वये, दि. 31/12/2015 पूर्वीची अनधिकृत बांधकामे प्रशमन शुल्काव्दारे प्रशमित संरचना म्हणून नियमित करता येतील. पर्यायाने प्रशमन शुल्क, प्रशमित संरचना पायाभूत सुविधा शुल्क व प्रशमित संरचना प्रिमियम शुल्क आकारणीमुळे उत्पन्नवाढीस मदत होईल. तसेच नाशिक महापालिका हद्दीतील चटई क्षेत्र निर्देशांकाचे उल्लंघन झालेल्या व भोगवटा दाखल्यापासून वंचीत असणा-या इमारतींना हार्डशिप दंड आकारुन भोगवटा दाखला दिल्यास, अंदाजे रु. 100.00 कोटी हार्डशिप प्रिमियम फी प्राप्त होऊ शकेल.

<u>पाणीपट्टी :</u>

नागरीकांना सुरळीत पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याकडे प्राधान्याने लक्ष देण्यात येत आहे. शहरास प्रामुख्याने गंगापूर धरण व दारणा नदीवरील चेहेडी बंधाऱ्यावरुन पाणी पुरवठा होतो. तथापि भविष्यातील निकड लक्षात घेता व 24X7 पाणी पुरवठयाच्या दृष्टीने मुकणे धरणातून पाणी पुरवठयाचे नियोजन करण्यात येत आहे. हिशोबबाहय पाण्यावरील नियंत्रणाकरीता अनधिकृत नळजोडण्या खंडीत करण्याची धडक मोहीम हाती घेण्यात येत आहे.

पाणी पुरवठा यंत्रणा ¨ना-नफा, ना-तोटा’ तत्वावर चालविणेच्या दृष्टीने पाणी उत्पादन खर्चाइतका उपभोक्ता आकार (पाणीदर) लावणे आवश्यक आहे. शासन मार्गदर्शक

सूचनांनुसार व्हॅल्युमेट्रीक पध्दतीने पाणीपट्टी दर आकारणी गरजेची आहे. तसेच टेलिस्कोपिक रेट व इक्विटेबल ॲक्सेस तत्वानुसार नवीन पाणीदर आकारणी करणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या दरानुसार सन 2019-20 करीता रु. ६५.४२ कोटी पाणीपट्टी वसुलीचे उद्दिष्ट निश्चित करणेत आले आहे. सदरचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जलगळती थांबविणे, एन.आर.डब्ल्यू. कमी करणे, अनधिकृत नळ जोडणीवर कारवाई करणे व पाणीपट्टीची थकबाकी वसूल करणे या उपाययोजनांवर भर देण्यात येत आहे.

-खर्चाच्या बाबी -

महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या उत्पन्नातून खर्चाच्या बाबींची प्राथमिकता ठरवितांना आधुनिक सोयी सुविधांयुक्त रस्ते, पाणी पुरवठा, मलनिःसारण व्यवस्था, वैदयकीय रुग्णालये, सार्वजनिक स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन, नदी स्वच्छता, परिवहन सेवा, उद्याने, क्रिडांगणे, महिलांसाठी सुविधा इ. बाबींचा विचार करण्यात आलेला आहे.

सार्वजनिक बांधकाम :

मुख्य रस्ते/अंतर्गत रस्ते विकसित करणे :

महापालिका क्षेत्रातील रस्त्यांचे अस्तरिकरण करणे, खडीच्या रस्त्यांचे डांबरीकरण करणे व नव्याने विकसित झालेल्या वसाहतींमध्ये खडीचे रस्ते तयार करण्याचे नियोजन आहे. तसेच सातपूर व अंबड औद्योगिक वसाहतीमधील रस्त्यांचे अस्तरिकरण करणेचे काम प्रस्तावित आहे. रस्त्यांची कामे करतांना विकास आराखडयानुसार रुंदी व मंजूर ले-आऊट मधील रत्यांची रुंदीचा (Right of Way) विचार करणे गरजेचे आहे. तसेच आवश्यक गाडीमार्गाची रुंदी (Carriage Way), पाणी निचरा जलनि:स्सारण व्यवस्था, युटीलिटी डक्टस्, फुटपाथ इ. सुविधांचा अंतर्भाव करुन, शहर व आजूबाजूच्या खेडयातील नागरिकांना सुव्यवस्थित सुविधा देण्याचा मानस आहे. त्याचप्रमाणे प्राधान्याने जोडरस्ते (Missing Link) विकास करणेचे नियोजन करणेत येत आहे.

स्मशानभूमींची सुधारणा/नुतनीकरण :

शहरातील स्मशानभूमींची सुधारणा व नुतनीकरणाची कामे हाती घेणेचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच अल्पसंख्यांक समाजाच्या स्मशानभूमींची सुधारणा व नुतनीकरण करणेत येत आहे. याव्यतिरिक्त स्मशानभूमी परिसरातील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, नातेवाईक/नागरिकांसाठी बैठक व्यवस्था इ. सुविधा पुरविणेबाबत विशेष दक्षता घेणेत येत आहे.

पूल व सांडवे बांधणे :

स्मार्ट सिटी ग्रीन फिल्ड प्रकल्पांतर्गत विकसित करणेत येणा-या भागासाठी पूल/उड्डाणपूल बांधणेची कामे हाती घेणेत येत आहे. त्याअंतर्गत गोदावरी नदीच्या तांबट घाट परिसरातील 30 मीटर डी. पी. रस्त्यावरील पूल, सुला वाईन चौकापासून 30 मीटर डी. पी. रस्त्यावरील नागरे नर्सरी येथील पूल, तसेच मायको सर्कल व रविवार कारंजा येथे उड्डाणपूल बांधणेचे नियोजन आहे.

क्रिडांगणे विकसित करणे :

महापालिका क्षेत्रातील सहा विभागांमध्ये मोठी क्रिडांगणे विकसित करणेचे नियोजन करणेत येत आहे.

दिव्यांग प्रशिक्षण केंद्र :

दिव्यांगांसाठी नाशिक पूर्व विभागातील आरक्षित जागेत रु. 17.00 कोटी खर्चाचे प्रशिक्षण केंद्र उभारणेचे नियोजन करणेत येत आहे. सदर प्रशिक्षण केंद्रात प्रशासकीय कार्यालय, विविध उपचार कक्ष, एक्वाथेरपी पूल, प्रशिक्षण वर्ग, वाचनालय, मल्टीपर्पज हॉल, खेळाचे मैदान, पार्किंग व फर्निचर यांचा समावेश आहे.

शहर अडथळामुक्त (बॅरिअर फ्रि सिटी) उपाययोजना :

दिव्यांग व जेष्ठ नागरीकांना सार्वजनिक सेवा सुविधांचा सुलभतेने वापर करता येण्याच्या दृष्टीने, विविध उपाययोजना करणेचा मानस आहे. तसेच मनपा मुख्य कार्यालय व विभागीय कार्यालयांमध्ये सदर उपाययोजना करण्याचे नियोजन आहे. त्याचप्रमाणे शहरातील मुख्य रस्ते, चौक, फूटपाथ या ठिकाणी सुयोग्य नियोजन करुन, दिव्यांग व जेष्ठ नागरीकांना त्यांचा सुलभ वापर होण्याच्या दृष्टीने नियोजन करणेत येत आहे.

सायकल ट्रॅक विकसित करणे :

प्रायोगिक तत्वावर नाशिक (पश्चिम) विभागातील कृषीनगर येथे सुमारे 900 मीटर लांबीचा सायकल ट्रॅक विकसित करणेत येत आहे. सदर ट्रॅकच्या उपयुक्ततेनुसार शहराच्या अन्य भागांतही सायकल ट्रॅक विकसित करणेचे नियोजन आहे. सायकल ट्रॅकसह मुख्य रस्ते/नवीन रस्ते विकसित करणेचा मानस आहे.

जॉगिंग ट्रॅकमध्ये सुधारणा करणे :

विविध ठिकाणचे जॉगिंग ट्रॅक व मैदानांची सुधारणा/नुतनीकरण करणेसाठी क्रिडाविषयक राखीव तरतुदीमधून कामे हाती घेण्यात येणार आहेत.

नाटयगृह इमारत बांधणे :

नाशिकरोड विभागातील स.नं. 117 येथे नाटयगृह बांधणेचे काम कार्यादेश स्तरावर असून, पुढील दोन वर्षात सदर काम पूर्ण करणेचे नियोजन आहे. तसेच पंचवटी विभागातील स.नं. 211 येथे नाटयगृह बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे गंगापूर रोड येथील स.नं. 450 येथे नाटयगृह बांधणेचे नियोजन आहे.

पार्किंग व्यवस्था :

नाशिक शहरातील मुख्य रस्त्यांवरील 34 ठिकाणी समांतर पार्किग व्यवस्थेची, तसेच अन्य 7 भूखंडांवर स्वतंत्र पार्किंग व्यवस्थेची कार्यवाही करणेत येत आहे. यासाठी ICT यंत्रणेचा वापर करुन स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत स्मार्ट पार्किंग करणेचा मानस आहे.

महिलांसाठी उद्योग भवन बांधणे :

पंचवटी येथे महिलांसाठी सुमारे 5260 चौ.मी. आरक्षित जागेत उद्योग भवन विकसित करणेचे नियोजन आहे. यामध्ये महिला उद्योजकांसाठी 17 गाळे, 9 ऑफिसेस व 3 मोठे हॉल उपलब्ध होणार आहेत.

व्यावसायिक मार्केट उभारणी :

सातपूर गावठाणातील छत्रपती शिवाजी मंडई मध्ये फळभाजी व्यवसायिकांसाठी नवीन ओटे बांधणे, तसेच गंगापूर गावातील वाढीव भाजी मार्केट उभारणेचे नियोजन करणेत आलेले आहे.

पाणी पुरवठा व्यवस्थापन :

नाशिक शहराच्या गरजेपैकी 90 टक्के पाणी गंगापूर धरणातून व 10 टक्के पाणी दारणा नदीवरील चेहडी बंधा-यातून उचलण्यात येते. शहरातील सहा जलशुध्दीकरण केंद्रांत त्यावर प्रक्रीया करुन, सम्प पंप/एमबीआर मार्फत पाणी ईएसआर मध्ये घेतले जाते. ईएसआर मधून जलवितरण वाहिन्यांव्दारे पाणीपुरवठा करण्यात येतो. सदय:स्थितीत 6 जलशुध्दीकरण केंद्रे, 6 एमबीआर व 97 ईएसआर/जीएसआर व्दारे सुमारे 1800 कि.मी. जलवितरण वाहिन्यांतून पाणी वितरण करण्यात येत आहे. शहरास प्रतिदिन सुमारे ४५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येतो .

शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन, मुकणे धरणातून पाणी पुरवठा करणेसाठी जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत काम सुरु आहे. सदर काम यावर्षी पूर्ण होऊन प्रथम टप्यात नाशिक पूर्व, पंचवटी व नविन नाशिक मधील इंदिरानगर, वासननगर, चेतनानगर, दीपालीनगर या ठिकाणच्या पाणीपुरवठ्यात सुधारणा होणार आहे.

सद्य:स्थितीत पाणीपुरवठा प्रणालीतील ¨उगम स्त्रोत' (Source), ¨वहन व्यवस्था' (गंगापूर धरणापासून जलशुध्दीकरण केंद्र व एमबीआर पर्यंत पाणी पुरवठ्याचे वहन) आणि ¨वितरण व्यवस्था' (ईएसआर ते उपभोक्ता नागरिक) या तीनही टप्प्यांमध्ये स्काडा (SCADA) या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केलेला नाही. धरण (Catchment) ते प्रत्यक्ष पाणी वापरणा-या ग्राहकापर्यंतचा (Consumer) पाण्याचा प्रवास व त्याचा हिशोब ठेवणेच्या दृष्टीने, उपरोक्त तीनही भागांमध्येही स्काडा यंत्रणा कार्यान्वित करणे आवश्यक आहे. पाणी गळती थांबवून पाण्याचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी देखील त्याचा उपयोग होणार आहे. स्मार्ट सिटी प्रकल्पातील पॅनसिटी योजेनेंतर्गत ¨धरण ते नागरिक' या संपूर्ण पाणीपुरवठा व्यवस्थेसाठी स्काडा प्रणाली बसविण्यात येणार आहे. प्राथमिक सर्वेक्षणानुसार शहराचा अनुत्पादक पाणी वापर (Non Revenue Water-NRW) ४३% असून, तो कमी करणे अत्यावश्यक आहे.

सद्यस्थितील ग्राहक पाणी मिटर मॅकेनिकल बी-टाईपचे असून, ते लवकर नादुरुस्त होतात. तसेच पाणी वापर देयकांत नागरिकांना सरासरी बिल आकरणी होते. पाणी वापरानुसारच देयक आकारणी होण्याच्या दृष्टीने, स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत शहरातील सर्व नळ जोडण्यांना AMR सुविधेसह जलमापके बसविण्यात येणार आहेत. SCADA व AMR जलमापकांसाठी स्मार्ट सिटी प्रकल्पात तरतूद करण्यात आली आहे. तसेच जलशुध्दीकरण

केंद्र दुरुस्ती, नविन वितरिका व जलकुंभासह पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील सुधारणेसाठी रु. ४५१.५९ कोटी खर्चाचा प्रकल्प अहवाल (DPR) शासनास सादर करण्यात आला आहे.

गावठाण भागातील जुन्या जलवाहीन्या, पाणी गळती, असमान पाणीपुरवठा व दूषित पाणी समस्येच्या परिमार्जनासाठी स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत ग्राहकांना 24 X 7 पाणी पुरवठा करण्याची योजना राबविणेत येत आहे. जुन्या व खराब झालेल्या जलवाहीन्या काढून, सुमारे 101 कि.मी. लांबीच्या नवीन जलवाहीन्या टाकण्यात येणार आहेत. तसेच 3 नवीन जलकुंभ बांधून त्याद्वारे 24 X 7 पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे.

तसेच पाणीपुरवठा वितरण व्यवस्था (Distribution System) सुधारणेच्या उपाययोजना करणेत येत आहेत. विकसित होणा-या भागातील जलकुंभ व वितरण वाहिन्यांची कामे पूर्ण करणे, वितरण वाहिन्या नसलेल्या भागात सुमारे 102 कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या टाकणे, तसेच जुन्या वितरीका बदलणे या कामांस प्राधान्य देण्यात येत आहे.

पाणी पुरवठयाच्या उपरोक्त कामांसाठी सन 2019-20 या वर्षात रु. 85.37 कोटी इतकी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे.

<u>मलनि:सारण व्यवस्था :</u>

केंद्र शासनाच्या जेएनएनयुआरएम (JNNURM) प्रकल्पांतर्गत तपोवन मलनि:सारण केंद्रामध्ये बायोगॅस इंजिन बसविण्यात आले आहे. त्यातून तयार होणारी वीज मलनि:सारण केंद्रासाठी वापरण्यात येत आहे. सदर ठिकाणी ७८ व ५२ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेची दोन मलजलनि:सारण केंद्रे कार्यान्वित आहेत. गंगापूर येथे 18 दशलक्ष लिटर क्षमतेचे मलनि:सारण केंद्र बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच पिंपळगांव खांब येथे 32 दशलक्ष लिटर क्षमतेचे मलनि:सारण केंद्र बांधणीच्या कामापैकी मलजल उपसा केंद्राचे काम सूरु करण्यात आले आहे.

महापालिकेचे सर्व जलशुध्दीकरण केंद्र, पंपींग स्टेशन व मलशुध्दीकरण केंद्र यांमध्ये उच्च दाबाचे वीज कनेक्शन आहे. महावितरण कंपनीकडून सर्व केंद्रांवर पॉवर फॅक्टरमध्ये सुधारणा करुन घेऊन, पॉवर फॅक्टर इन्सेन्टिव्हपोटी वीज बिलांत बचत करण्यात येत आहे. तसेच वीज बिलापोटी प्राँप्ट पेमेंट डिस्काऊंट प्राप्त करुन घेण्यात येत आहे.

<u>विद्युत व्यवस्था :</u>

महापालिका क्षेत्रामध्ये नवीन पथदीप उभारणे, पथदीप व्यवस्थेतील सुधारणा करणे, वाहतूक स्वयंचलीत यंत्रणा बसविणे, मनपा कार्यालये/रूग्णालये/शाळांचे विद्युतीकरण करणे, सीसीटीव्ही बसविणे इ. सुविधा उपलब्ध करुन देणेत येत आहेत. शहरातील पारंपारीक पथदीप बदलणे, पथदिप फिटींग्ज बसविणे यांकरीता सार्वजनिक खाजगी सहभागातुन (PPP तत्वावर) स्मार्ट स्ट्रीट लाईट व CCMS प्रणाली कार्यान्वीत करणेचा मानस आहे. सदर प्रकल्पामुळे पथदिप सेवेत सुधारणा होऊन, प्रत्यक्ष विज वापर व पथदीप देखभाल दुरूस्ती खर्चामध्ये बचत होणार आहे. अत्याधुनिक CCMS प्रणालीमुळे पारदर्शकपणे व मानवी हस्तक्षेपाविना पथदिप व्यवस्थापन करता येईल. तसेच लाईट चालू/बंद करणेची वेळ निर्धारीत करुन, पथदिप दुरूस्तीबाबत रिअल टाईम माहिती व दर्जेदार सेवा उपलब्ध होईल. विद्युत पोलची उभारणी व पथदिप व्यवस्था सुधारणांसाठी अंदाज पत्रकात रु. 11.75 कोटी तरतूद करण्यात आली आहे.

नाशिकरोड येथील नवीन बिटको हॉस्पीटल विद्युतीकरणाचे काम अंतीम टप्प्यात आहे. अर्बन मोबिलीटी सेल यांचेकडील निर्देशानुसार वाहतूक सिग्नलची ठिकाणे प्रस्तावीत करणेत येतात. त्यासाठी अंदाज पत्रकात रु. २५.०० लक्ष तरतूद प्रस्तावीत केलेली आहे. स्मार्ट सिटी RESCO मॉडेलनुसार मनपा कार्यालय, रूग्णालय व इमारतींवर सोलर रूफ टॉप बसविणेचा पथदर्शी प्रकल्प हाती घेणेत आलेला आहे. सद्यस्थीतीत महापालिकेस रू. ११ प्रती युनीट प्रमाणे वीज खरेदी करावी लागत असून, सोलर प्रकल्पांतर्गत आगामी २५ वर्षांसाठी रू. ४.५९ प्रती युनिट याप्रमाणे वीज प्राप्त होणार आहे. केंद्र शासनाच्या SECI या संस्थेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार १६ मनपा इमारतींवर सोलर रूफ टॉप बसविणेसाठी पॉवर पर्चेस ॲग्रीमेंट करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासनाच्या उर्जा बचत धोरणानुसार, शहरात ११,५२५ एलईडी फिटींग बसविण्यात येत आहेत.

<u>कार्यशाळा व्यवस्थापन :</u>

महापालिकेच्या विविध विभागांना आवश्यकतेनुसार स्पेशल पर्पज व्हेईकल व यंत्रे उपलबध करुन देण्यात येतात. गोदावरी व अन्य नदया स्वच्छ आणि प्रवाही राहण्याच्या दृष्टीने, रोबोटीक एस्कॅव्हेटर मशिनव्दारे नदीपात्रातील गाळ व पानवेली काढणेत येत आहे. सदर काम अधिक कार्यक्षमतेने करणेसाठी पुढील वर्षी अतिरिक्त रोबोटीक एस्कॅव्हेटर मशिन उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

<u>माहिती व तंत्रज्ञान :</u>

महानगरपालिका प्रशासनात ई-गव्हर्नन्सचा प्रभावी वापर करणेत येत आहे. नागरी सुविधा केंद्रांसाठी ऑनलाईन कार्यप्रणाली कार्यान्वीत असून, नागरिकांना एकाच ठिकाणी विविध दाखले, परवानगीपत्र देणेत येतात. नागरी सुविधा केंद्रामार्फत महापालिकेच्या ४३ सुविधा पुरविण्यात येतात. सदर कामामध्ये कमीत कमी हस्तक्षेप होऊन नियमानुरुप व विहीत वेळेत कामकाज होणेकरीता नागरी सुविधा केंद्रांमधील सेवांचे Business Process Re-engineering (BPR) करण्यात येत आहे. तसेच NMC e-Connect या मोबाईल ॲपवर 55 ऑनलाईन सेवा नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

ऑनलाईन तक्रार निवारण कार्यप्रणाली (Grievance) कार्यान्वीत असून, नागरिकांच्या तक्रारींच्या परिणामकारक निवारणाकरीता सदर कार्यप्रणालीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच LFMS प्रणालीनुसार मनपाचा दैनंदिन आवक/जावक पत्रव्यवहार ऑनलाईन ठेवणेत आला आहे.

महानगरपालिकेच्या कालिदास कलामंदिर व कलादालनाच्या बुकींगकरीता ऑनलाईन संगणकीय आज्ञावली विकसित करण्यात आली असून, त्यामुळे नाटयगृह बुकींगच्या कामकाजात गतीमानता, सुलभता व पारदर्शकता येत आहे. तसेच मनपाची समाजमंदिरे, सभामंडप, अभ्यासिका, वाचनालये, व्यायामशाळा, खुल्या जागा, गाळे, ओटे अशा सर्व मिळकतींचे संगणकीकरण करण्यात आल्याने, मिळकत ताब्यात असणा-या संस्थेचे नांव, करारनाम्याचा दिनांक, भाडेपटटयाचा तपशील, थकबाकीच्या नोंदी सहजगत्या प्राप्त होत आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वैद्यकीय सुविधांचे सुलभीकरण करण्याच्या दृष्टीने,

हॉस्पिटल मॅनेजमेंट आज्ञावली (Hospital Management System) विकसित करण्यात आली आहे. शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनूसार रुग्णालयांमध्ये ई-हॉस्पिटल (HMIS) संगणक प्रणालीचा वापर करणेचा मानस आहे.

महापालिका क्षेत्रातील विकास हक्क हस्तांतरणाचे (टीडीआर) वाटप, नियमन व व्यवस्थापनासाठी ऑनलाईन संगणकीय कार्यप्रणाली विकसित करणेत येत आहे. त्यामुळे टी.डी.आर. वाटपाच्या कामकाजात पारदर्शकता व सुसूत्रता निर्माण होईल. टीडीआर वाटपाचा विभागनिहाय तपशील, टीडीआर धारकाचे नांव तसेच अन्य तपशील एका क्लिकवर प्राप्त होऊ शकेल. तसेच शुल्क आकारणीबाबत होणारा विलंब टाळता येईल.

मनपा विभागांच्या प्रशासकीय कामाकरिता इंटिग्रेटेड एन्टरप्राईजेस सोल्यूशन विकसीत करण्याचे प्रस्तावित असून, त्यामुळे कामकाजाची गती वाढून कामकाजात पारदर्शकता येईल. तसेच मनपाच्या सर्व ऑनलाईन सेवांच्या डॅशबोर्डचे एकत्रिकरण करुन, एका स्क्रिनवर सर्व डॅशबोर्ड उपलब्ध करुन घेणे व कामकाजावर संनियंत्रण ठेवणेकरीता Business Intelligence Tools च्या माध्यमातून कार्यप्रणाली विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. सद्यस्थितीत सदर कार्यप्रणाल्यांचे स्वतंत्र डॅशबोर्ड उघडावे लागतात, सर्व संगणकीय कार्यप्रणालीच्या डॅशबोर्डचे Business Inelligence Tools च्या साहाय्याने एकत्रिकरण केल्यास, नागरी प्रशासनाचा Real Time अहवाल प्राप्त होऊ शकेल. मनपाच्या ई-सुविधा केंद्राचा विस्तार करण्याच्या दृष्टीने, सदर ई-सुविधा केंद्रे PPP तत्वावर कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे.

गोदावरी संवर्धन :

महापालिका क्षेत्रातून जवळपास 19 किलोमीटर लांब व 100 फूट रुंदीचे गोदावरी नदीपात्र प्रवाहीत होत आहे. गोदावरी नदी बारमाही नसल्यामुळे, उपलब्ध आवर्तनाच्या आधारे प्राप्त जलसाठा सवंर्धन करुन, त्यातील प्रदूषण टाळण्याच्या दृष्टीने गोदावरी संवर्धन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. नागरीकांनी नदीपात्रामध्ये कचरा टाकणे, कपडे/वाहने धुणे, निर्माल्य टाकणे वा अन्य प्रकारे नदी प्रदूषण केल्यास, दंडात्मक कारवाई करण्यात येते. होळकर पूल ते टाळकुटेश्वर पूल यादरम्यान स्वच्छतेबाबत विशेष लक्ष देण्यात येत आहे.

स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या ‘प्रोजेक्ट गोदा’ अंतर्गत, गोदावरी नदीच्या उपनदयांमधील मलजल अडवून अन्यत्र वळविणेचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच होळकर पूल ते फॉरेस्ट नर्सरी पूल यादरम्यान नदी पात्रातील गाळ/माती काढली जाणार आहे. त्यामुळे नदीपात्राची वहनक्षमता वाढण्यास मदत होणार आहे. त्याचप्रमाणे नदीपात्राचे सुशोभीकरण व विस्तारीकरण करुन, भाविक व पर्यटकांसाठी विविध सोई-सुविधा देखील प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. याव्यतिरिक्त पानवेलीच्या परिणामकारक निर्मूलनासाठी यांत्रिक फ्लोटर मशिनचा वापर प्रस्तावित करण्यात आला आहे.

नगरनियोजन :

विकास आराखडयात आरक्षीत करण्यात आलेल्या भूखंडांच्या संपादनासाठी मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. शासन धोरणानुसार आरक्षण असलेले भूखंड महापालिकेने वेळेवर संपादित न केल्यास, सदर आरक्षण व्यपगत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब

महापालिका क्षेत्रातील आरक्षीत भूखंडांच्या संपादनासाठी अंदाज पत्रकात रु. १३३.५० कोटी रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे.

<u>समाजकल्याण :</u>

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध दुर्बल घटकांना उचित सेवा-सुविधा प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने, मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी 5%, महिला/बाल कल्याणासाठी 5%, दिव्यांग कल्याणासाठी 5% व क्रिडा धोरणासाठी 5% असा एकूण 20% निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

5% मागासवर्गीय कल्याणकारी योजना :

शासन मार्गदर्शक सुचनांनुसार महानगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/ विमुक्त जाती व भटक्या जमाती या दुर्बल घटकांकरिता विवीध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी ५% निधीची तरतूद करणेंत आली आहे. सदर निधीतून मागासवर्गीय वस्त्यांमध्ये सार्वजनिक रस्त्यांची कामे, पथदिप, पाणीपुरवठा, मल:निसारण व्यवस्था, उदयान विकासाची कामे हाती घेण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

5% महिला व बाल कल्याण योजना :

महिला व बाल कल्याणासाठी राखीव ठेवण्यांत आलेल्या ५% निधीतून घटस्फोटीत/विधवा/परिक्तत्या महिलां/मुलींच्या विवाहा करिता अर्थसहाय्य, विधवा/ घटस्फोटीत महिलांची मुले, निराधार मुले यांचेसाठी शिष्यवृत्ती, अनाथ/निराश्रीत मुलांना दत्तक घेणाऱ्या पालकांना प्रोत्साहन अनुदान, अनाथ/निराश्रीत मुलांकरिता वार्षिक शैक्षणिक शुल्क अर्थसहाय्य इ. योजना राबविण्यास मान्यता आहे. महापालिकेच्या अंगणवाडया आदर्श होण्याच्या दृष्टीने, पत्र्याच्या 126 अंगणवाडयांचे बांधकाम करणे प्रस्तावित आहे. तसेच शासन मार्गदर्शक सूचनांनुसार रस्त्यावर रहाणाऱ्या बालकांचे सर्वेक्षणाचे काम सुरु करणेंत आले आहे. अंगणवाडीतील बालकांना पूरक सकस आहार देणेबाबत नियोजन करण्यांत येत आहे.

5% दिव्यांग कल्याणकारी योजना:

महापालिका कार्यक्षेत्रातील अंध/अपंग/मतिमंद/बहुविकलांग/अन्य दिव्यांगांच्या अर्थ सहाय्याकरिता महापालिकेतर्फे कर्णबधीर शस्त्रक्रिया (Chochlear Implant) अर्थसहाय्य, दिव्यांग स्वयंरोजगार अर्थसहाय्य, प्रौढ बेरोजगार दिव्यांग अर्थसहाय्य, दिव्यांग विद्यार्थी पालक प्रशिक्षण अर्थसहाय्य, दिव्यांग शिष्यवृत्ती व व्यवसाय प्रशिक्षण अर्थसहाय्य, दिव्यांग सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान अर्थसहाय्य, विशिष्ट गरजेच्या दिव्यांगांना अर्थसहाय्य व दिव्यांग क्षेत्रातील संस्था/संघटनांचे सक्षमीकरण अशा स्वरुपाच्या 8 योजना हाती घेण्यात आलेल्या आहेत.

याव्यतिरिक्त दुसऱ्या व्यक्तींवर अवलंबून असणा-या 70% वरील दिव्यांग व्यक्तींसाठी निवृत्तीवेतन योजना सुरु करण्यात येत आहे. तसेच एकाच छताखाली दिव्यांग शिक्षण, प्रशिक्षण व

सेवा-सुविधा केंद्र उभारण्याचे नियोजन करणेंत येत आहे. त्याचप्रमाणे दिव्यांगांना विभागीय कार्यालये, महापालिका रुग्णालयांमध्ये सहजगत्या वावर करता येण्याच्या दृष्टीने, दिव्यांगांसाठी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याचे नियोजन करणेंत येत आहे.

5% क्रिडा विषयक योजना :

क्रिडा विषयक योजनांसाठी ५% निधीची तरतूद करणेंत आलेली आहे. शासनाच्या "खेलो इंडिया' संकल्पनेतून महापालिका क्षेत्रातील मुला-मुलींना मैदानी खेळांकडे प्रोत्साहीत करण्याच्या दृष्टीने सर्व सहा विभागांमध्ये मोठी क्रिडांगणे विकसित करण्याचे नियोजन करणेत आले आहे. तसेच राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रथम/व्दितीय/तृतीय क्रमांक मिळविणा-या खेळाडूंना क्रिडा शिष्यवृत्ती देण्याची योजना सुरु करण्यात येणार आहे.

युवा व जेष्ठ नागरिक धोरण :

विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या युवकांसाठी प्रोत्साहनपर युवा धोरण राबविण्यात येईल. त्याअंतर्गत अंदाजपत्रकात इन्क्युबेशन सेंटर, प्रसिध्दी व प्रचार कार्यक्रमांसाठी रू. 10.00 लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

वैदयकीय सुविधा व आधुनिक तंत्रज्ञानामुळे वाढते मानवी आर्युमान लक्षात घेता समाजातील जेष्ठ नागरिकांच्या संख्येत वाढ होत आहे. जेष्ठ नागरिकांच्या वृध्दापकाळातील अडचणी दूर करुन वृध्दांचे जगणे सुसहय करणेच्या दृष्टीने जेष्ठ नागरिक धोरण अवलंबविणेत येत आहे. जेष्ठ नागरिकांचे विरंगुळा केंद्र, आरोग्यविषयक/करमणूकीचे कार्यक्रम व चर्चासत्रांच्या आयोजन यांकरीता रू. 10.00 लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

<u>शैक्षणिक सुविधा :</u>

महापालिकेच्या 90 शाळांमधून 27,322 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दर्जेदार शिक्षणासोबतच विदयार्थांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय ठेवून, गरीब विद्यार्थ्यांना खाजगी शाळांप्रमाणे दर्जेदार शिक्षण देण्यासाठी महानगरपालिका कटिबध्द आहे. तसेच विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सुविधा देवून, त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

महानगरपालिका शाळांमधील ६ ते १४ वयोगटाच्या मुलींसाठी सॅनिटरी नॅपकिन व डिस्पोजल मशिनसाठी प्रथमच सन 2019-20 च्या अंदाजपत्रकात रु. 37.00 लक्ष तरतूद करण्यात आली आहे. सर्व मनपा शाळांमध्ये प्रत्येकी एक सॅनिटरी नॅपकिन मशिन व एक डिस्पोजल मशिन बसविण्यात येईल.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत मागासवर्गीय संवर्गातील विद्यार्थांना गणवेश पुरविण्यात येतात. तथापि खुल्या संवर्गातील गरीब विदयार्थी सदर लाभापासून वंचित राहू नयेत म्हणून त्यांना प्रत्येकी दोन गणवेशासाठी अनुदान देण्याची तरतूद सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकात करण्यात आली आहे. तसेच महापालिका शाळांमधील विदयार्थांच्या बूट व मोज्यांसाठी खर्चाची तरतूद करण्यात

आली आहे. त्याचप्रमाणे मनपा शाळातील विद्यार्थ्यांना धार्मिक व ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्यासाठी अंदाजपत्रकात रु. 50.00 लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना अत्याधुनिक पदधतीने शिक्षण देण्यासाठी 90 मनपा शाळांमध्ये संगणक पुरवून त्या डिजिटल करणेसाठी रू. 50.00 लक्ष तरतूद करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागून, त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळण्याच्या दृष्टीने सर्व मनपा शाळांमधील विज्ञान साहित्य खरेदी व प्रयोगशाळा अदयावत करणेकामी रू. 25.00 लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

दुषित पाण्यापासून होणारे आजार टाळणेसाठी विद्यार्थ्यांना शुध्द पाणी उपलब्ध करून देणेच्या दृष्टीने सर्व मनपा शाळांमध्ये प्रथमच वॉटर प्युरिफायर बसविण्यासाठी, तसेच मनपा शाळांमध्ये अग्निरोधक यंत्रणा बसविण्यासाठी पुरेशी तरतूद करण्यात आली आहे. जेतवननगर येथील शाळेमध्ये ५० विद्यार्थी निवासी शिक्षण घेत आहेत. सदर वसतीगृहातील विद्यार्थी अत्यंत गरीब/अनाथ असल्याने, त्यांना मुलभूत सोईसुविधा देणेकामी पुरेशी तरतूद करण्यात आली आहे.

अद्ययावत मनपा इमारत निर्मितीसाठी रू. 13.00 कोटी तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणेच्या दृष्टीने मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी खेळणी घेणेकामी रू. 10.00 लक्ष तरतूद करण्यात आली आहे. तसेच सर्व शाळांमध्ये क्रिडा साहित्य उपलब्ध करून देणेत येत आहे. कार्यालयीन खर्च व क्रिकेट, बॅडमिंटन, फुटबॉल, व्हॉलीबॉल या खेळांचे साहित्य पुरविण्यासाठी रू. 1.50 कोटी तरतूद उपलब्ध करण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे शैक्षणिक सुविधांसाठी रू. 88.00 कोटी इतकी अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आलेली आहे.

सार्वजनिक स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन :

महापालिकेच्या 1,903 सफाई कर्मचा-यांमार्फत शहरातील रस्ते, मोकळी मैदाने, सार्वजनिक ठिकाणे, भाजी मार्केटस यांची दैनंदिन स्वच्छता करणेत येते. तसेच रामकुंड, गोदाघाट येथे स्वतंत्र स्वच्छता निरीक्षक नेमून, गोदावरी नदीपात्राची स्वच्छता राखणेची दक्षता घेणेत येते. त्याचप्रमाणे सार्वजनिक कार्यक्रम, धार्मिक सणांच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता मोहिम राबविणेत येते. दैनंदिन 500-550 टन संकलीत केलेला कचरा बाहययंत्रणेव्दारे 255 घंटागाडीच्या सहाय्याने पालिकेच्या खत प्रकल्पावर रवाना केला जातो. पाथर्डी शिवार येथील खत प्रकल्पावर संपूर्ण शहरातील वर्गीकृत घनकचऱ्यावर कल्चर, सॅनिटायझर फवारुन, दुर्गंधी कमी करुन व 30 दिवस प्रक्रिया करुन, त्यापासून कंपोस्ट खत तयार केले जाते.

घनकचऱ्यातील अविघटनशील भागापासून आरडीएफ व प्लास्टीकपासून एलडीओ ऑईल तयार केले जाते. तसेच खत तयार झाल्यानंतर अविघटनशील (इनर्ट) कचरा लँडफिलवर टाकला जातो. सदर प्रकल्पातील चार लँडफिलपैकी (A,B,C,D) दोन लँडफिल (CवD) शास्त्रोक्त पध्दतीने रिमेडिएशन करुन, A व B लँडफिलवर टाकण्यात आले आहेत तसेच .शास्त्रोक्त लॅडफिल (S.L.F.) तयार करण्यात आली आहे. सदर लँडफिलवर विविध थर टाकून, त्यावर हिरवळ लावणेत येत आहे .

केंद्र व जर्मन शासनाच्या संयुक्त प्रयत्नातून घनकचऱ्यापासून विजनिर्मितीचा वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प मनपाने कार्यान्वीत केलेला आहे. सदर प्रकल्पात दररोज सुमारे 15-20 मेट्रीक टन

ओला कचरा (हॉटेल वेस्ट) व 10-15 किलोलिटर सार्वजनिक शौचालयातील मलजलावर प्रक्रीया करुन, मिथेन गॅसव्दारे दररोज सरासरी 700 युनिट विजनिर्मिती करणेत येत आहे. तसेच कंस्ट्रक्शन व डिमॉलीशन कच-यावर प्रक्रिया करणेच्या दृष्टीने, शहरातील कंस्ट्रक्शन व डिमॉलीशन वेस्ट संकलन, वाहतूक व प्रक्रिया करुन, त्यापासून विविध उप-उत्पादने तयार करण्यासाठी 100 मे.टन प्रतीदिन क्षमतेचा प्रकल्प पीपीपी तत्वावर प्रस्तावीत करण्यात येत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची योग्य देखभाल, निगा व दुरूस्ती करुन त्यांच्या उत्तम व्यवस्थापनासाठी लोक सहभागातून पे-ॲण्ड-यूज तत्वावर शौचालयांची व्यवस्था ठेवण्यात येत आहे. शहरातील 5,941 सिट्सच्या शौचालयांपैकी ३,१२१ सिट्स पुरूषांसाठी व 2,820 सिट्स स्त्रियांसाठी असून, त्यापैकी काही सिट्स पे-ॲण्ड-यूज तत्वावर चालविणेत येत आहेत. तसेच काही शौचालये सुलभ इंटरनॅशनल या संस्थेस देखभाल व साफसफाईकरीता चालविणेस देणेत आलेली आहेत. जाहिरात अधिकाराच्या अधिन राहून खाजगी संस्थेमार्फत PPP तत्वावर उर्वरित सार्वजनिक शौचालयांची साफसफाई करणेकामी नियोजन करणेत येत आहे. तसेच CSR मधून शहरातील प्रमुख ठिकाणी E-TOILET बसविणेत येत आहेत.

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर नागरी स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबविणेच्या अनुषंगाने, शहरातील नागरीकांना शौचालयांची सुविधा उपलब्ध करून देणेत येत आहे. तसेच पर्यावरण व आरोग्यविषयक समस्या टाळणेसाठी ¨घर तेथे शौचालय’ योजनेंतर्गत शौचालय नसलेल्या कुटुंबास अर्थसहाय्य देण्यात येत आहे. सर्वेक्षणानुसार पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना शौचालय बांधणेकामी, प्रथम हप्त्यापोटी प्रत्येकी रू. 6,000 व शौचालय बांधकामानंतर उर्वरित रू. 6,000 असे, रू. 12,000 अनुदान देणेत येत आहे. नाशिक मनपा क्षेत्रातील 7,841 कुटुंबांचे वैयक्तिक शौचालय बांधकाम पूर्ण झाले असून, शहरास ODF+ घोषित करणेत आले आहे.

मोफत अंत्यसंस्कार योजनेंतर्गत ¨अमरधाम’ येथे हिंदू धर्मीयांच्या मृतदेहांचे दहन, तसेच लिंगायत, गोसावी, नाथपंथी व गवळी समाजातील मृतदेहांच्या दफनविधीसाठी मोफत साहित्य पुरविणेत येते. त्याचप्रमाणे अंत्यसंस्कारासाठी डिझेल शवदाहिनी, नाशिक पूर्व विभागातील अमरधाम येथे विद्युत दाहिनी सुरू करणेत आली आहे. मुस्लिम व ख्रिश्चन धर्मीय मृतदेहांच्या दफनविधी अंत्यसंस्कारासाठी देखील मोफत साहित्य पुरविणेत येत आहे.

सार्वजनिक आरोग्य :

महापालिका कार्यक्षेत्रात 4 सार्वजनिक रुग्णालये व 30 शहर प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत. सार्वजनिक रुग्णालयांमध्ये आरोग्यसेवा, शस्त्रक्रिया, गर्भवती माता व नवजात शिशूसेवा पुरविल्या जातात. तसेच आवश्यक उपचार व प्रतिबंधात्मक सुविधा देण्यात येतात. शहर प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत बाहयरुग्ण तपासणी व उपचार, तसेच कुटुंब कल्याण, लसीकरण, किटकजन्य आजार, क्षयरोग, कुष्ठरोग, माता व बालसंगोपन कार्यक्रम इ. राष्ट्रीय कार्यक्रम राबविले जातात.

डॉ. झाकिर हुसेन रुग्णालयात बाहययंत्रणेव्दारे 321 विविध चाचण्या स्वस्त दरात उपलब्ध करणेत येत आहेत. तसेच मे.पिरामल स्वास्थ संस्थेसोबत करारनामा करुन, झोपडपट्टीतील गरीब रुग्णांना प्राथमिक उपचार, आरोग्य शिक्षण व अत्यव्यस्थ रुग्णांना नामांकित रुग्णालय सेवा देण्यात येणार आहे. कोणताही आर्थिक मोबदला न घेता, सदर सेवा देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे

सीएसआरच्या माध्यमातून झोपडपट्टयांमध्ये फिरत्या दवाखान्याची सोय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

नवीन जेडीसी बिटको रुग्णालयात एमआरआय, सीटी स्कॅन, डिजीटल एक्स-रे सुविधा, अद्ययावत प्रयोगशाळा कार्यान्वीत करणेत येत आहे. सातपूर येथे नवीन रुग्णालय बांधणेत येत आहे. तसेच नागरिकांना स्थानिक आरोग्यसेवा उपलब्ध होणेच्या दृष्टीने विविध भागातील मनपा मिळकती दुरुस्त करुन, अतिरिक्त 10 शहरी प्राथामिक आरोग्य केंद्रे सुरु करणेचे प्रस्तावीत आहे. त्याचप्रमाणे झोपडपट्टी परिसरात 25 मोहल्ला क्लिनीक सुरु करणेचे प्रस्तावीत असून, सेवानिवृत्त वैद्यकिय अधिका-यांच्या मदतीने रुग्णांची तपासणी करुन जेनेरिक औषधे देणेचे नियोजन आहे.

सीपीएस (COLLEGE OF PHYSICIANS & SURGEONS) मार्फत जेडीसी बिटको रुग्णालय येथे वैद्यकिय पदविका अभ्यासक्रम सुरु करणेचा प्रस्ताव असून, त्यामुळे आरोग्यसेवेसाठी निवासी वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होतील. तसेच महापालिका रुग्णालयांमध्ये मानधनावर वैद्यकिय अधिकारी घेणेचे प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे रुग्णालयातील आवश्यक उपकरणे, साहित्य व ॲम्ब्युलन्स खरेदी प्रस्तावीत आहे.

सार्वजनिक आरोग्य सेवेसाठी रु. 66.65 कोटी अंदाजपत्रकीय तरतूद करणेत आलेली आहे. याव्यतिरिक्त शासनाकडून एनयूएचएम, आरएनटीसीपी व हिवताप निर्मूलन कार्यक्रमांतर्गत स्वतंत्र अनुदान प्राप्त होणार आहे.

पशुवैद्यकीय सेवा :

शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महापालिका हद्दीतील मोकाट व भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात ठेवण्याच्या दृष्टीने श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया व अँटीरेबीज लसीकरण कार्यक्रम राबविणेत येत आहे. महापालिकेच्या कत्तलखान्यात येणा-या जनावरांच्या नोंदी, कत्तल फी वसूली, साफसफाई, महात्मा फुले मार्केट/भद्रकाली कत्तलखान्यांच्या इटीपी प्लॅन्टची (Effluent Treatment Plant) दैनंदिन देखभाल करणेत येते. महानगरपालिका क्षेत्रातील मृत जनावरांची विल्हेवाट खतप्रकल्पातील इनसिनरेटर येथे करणेत येते. अनाधिकृत मांस विक्री करणा-या व्यावसायिकांवर दंड, मांसजप्ती अशी कारवाई करणेत येते. उपरोक्त कामकाजाकरीता रु. 5.35 कोटी तरतूद करणेत आली आहे.

उद्यान विकास :

अमृत योजनेंतर्गत केंद्र व राज्य शासनाकडून शिवाजी उद्यानाच्या नुतनीकरणासाठी अनुक्रमे रु. 1.07 कोटी व रु. 53.50 लक्ष अनुदान मंजूर केले आहे. ब्रिटीशकालीन व शिवकालिन वैशिष्ठयांचा संगम ठेवून सदरचे स्मार्ट उदयान विकसित करण्यासाठी रु. 5.00 कोटी खर्च येणार आहे. त्यायोगे आकर्षक पर्यटनकेंद्र नाशिककरांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

नवीन नाशिकमध्ये 17 एकर जागेवर orchadium प्रकारातील भारतातील पहिले मध्यवर्ती उद्यान विकसीत करण्यात येत आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सदर उद्यानात 25 मीटर उंचीचे 5 व्हर्टिकल टॉवर, रेनवॉटर हार्वेस्टिंग, सोलर व्यवस्था, 18 मीटर उंचीवरील प्लॅटफॉर्म, आकर्षक खेळणी, साहसी सायकल ट्रॅक, जॉगींग ट्रॅक, मध्यवर्ती कारंजे, फूड हब, लॉन इ. वैशिष्ठे समाविष्ठ

आहेत. सदर प्रकल्पाचा खर्च रु. 34.00 कोटी अपेक्षित असून, जिल्हास्तरीय विशेष निधींतर्गत रु. 9.50 कोटी व पर्यटन अनुदानांतर्गत रु. 5.00 कोटी निधी उपलब्ध होणार आहे.

पंचवटी विभागातील कालिकानगर येथे 7 एकर जागेवर जॉगींग ट्रॅक व गार्डनचे काम चालू करण्यात येत आहे. तसेच सिन्नरफाटा येथे नवीन उद्यान, जुन्या नाशिक विभागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाचे नूतनीकरण, भाभानगर येथील कानडे उद्यानाचे नूतनीकरण, राका कॉलनीतील उद्यानाचे नूतनीकरण, सातपूर विभागातील हौसिंग कॉलनी येथे उद्यान यांसारखी उद्यानविषयक विकास कामे हाती घेण्यात येत आहेत. महापालिका कार्यक्षेत्रात 50 कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत 50 हजार वृक्ष लागवड करण्यात येत आहे. गोदावरी, नंदिनी, वालदेवी व दारणा नदयांचे पुर्नजीवन कार्यक्रम हाती घेणेत आला आहे.

महापालिका उद्यानांच्या नूतनीकरणांतर्गत लॉन लावणे, शोभिवंत वृक्षलागवड, पुष्पवाफे, पाथ वे व अन्य आवश्यक कामांचा व्यापक कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. तसेच PPP तत्वावर उदयानांच्या देखभाल दुरुस्ती व पुर्नविकासाकरीता तवलीफाटा उदयान, गोदावरी परिचय उदयान, के. सी. ठाकरे उदयान, जेतवननगर उदयान व वसंत कानेटकर उद्यान इ. उद्यानांचा विकास करणे प्रस्तावित आहे.

नाशिक शहरात ४७.७५ लक्ष इतकी वृक्ष संख्या असली तरी, अस्तीत्वातील वृक्षलागवड असंतुलीत आहे. त्यामुळे मनपा क्षेत्रातील जैवविविधता टिकवण्यासाठी सह्याद्री देवराई संस्थेचे संस्थापक अभिनेते सन्माननीय श्री. सयाजी शिंदे यांना ब्रॅन्ड ॲम्बेसेडर नेमून, शहरात ६ ठिकाणी देशी दुर्मिळ प्रजातीच्या वृक्षांची लागवड करून ¨नाशिक देवराई' प्रकल्पास सुरवात केली आहे. भविष्यात प्रत्येक प्रभागात एक देवराई करण्याचे नियोजन करणेत येत आहे. नाशिक मनपाने सुरु केलेला ¨शहरी देवराई' हा प्रकल्प राज्यातच नव्हे, तर देशाच्या शहरी भागातील पथदर्शी प्रकल्प ठरला आहे.

<u>अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन :</u>

महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडे वॉटर टेंडर, फायर टेंडर, मेगा बाऊजर, फ्लड रेस्कू व्हॅन, हायड्रॉलिक प्लॅटफार्म, बीए सेट व्हॅन, अतिशिघ्र प्रतिसाद व्हॅन (QRV) उपलब्ध आहे. शहरातील 35 मिटरपेक्षा उंच इमारतींना परवानगी दिली जात असल्याने, उंच इमारतींच्या आग संरक्षणासाठी विदेशी बनावटीची टर्नटेबल लॅडर (टी टीएल वाहन) खरेदी करणेचा मानस आहे. आग सुरक्षा निधीतून (फायर प्रोटेक्शन फंड) अग्निशमन सेवेच्या आधुनिकरणासाठी रु. 14.41 कोटी तरतूद करण्यात आलेली आहे.

शासनाचा आपत्कालीन व्यवस्थापन विभाग व एनडीएमअे यांचे निर्देशानुसार आपत्कालीन व्यवस्थापन चालविणे आवश्यक असते. महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षावरील जबाबदारी पाहता, सदर कक्ष सुसज्ज असणे गरजेचे आहे. पुढील वर्षी विविध ठिकाणी जनजागृती व आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण आयोजीत करून, नागरीक व स्वयंसेवकांसाठी सराव वर्ग आयोजीत करून दृकश्राव्य माध्यमातून प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

अतिक्रमण निर्मूलन :

महापालिका क्षेत्रातील खाजगी जागांवरील अनधिकृत बांधकामे व सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमणांचे निष्कासन करणेसाठी विभागीय कार्यालयांमध्ये अतिक्रमण पथके नियुक्त करण्यात आलेली आहेत. खाजगी जागांवरील अनधिकृत बांधकामे काढणेसाठी नियमबाहय बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी करुन अंतिम नोटीस दिल्यावर अनधिकृत बांधकाम काढण्याची कार्यवाही केली जाते. सार्वजनिक रस्ते व खुल्या जागांवरील अतिक्रमण कारवाई अंतर्गत हातगाडया, टप-या, स्टॉल, होर्डिंग, बॅनर इ. साहित्य जप्त करणेत येते. तसेच जप्त केलेले साहित्य सोडविण्यसाठी दंड वसूल करणेत येतो.

महापालिका क्षेत्रामधील अनधिकृत होर्डींग नियंत्रणासाठी सिटीझन कमिटीची स्थापना करण्यात येऊन, तक्रारीकरीता टोल फ्री क्रमांक व SMS सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच अनधिकृत होर्डींग लावणाऱ्यांविरुध्द पोलीस गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे अनधिकृत धार्मिक स्थळांबाबत मनपा स्तरावर समिती स्थापन करण्यात येऊन, मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अनधिकृत धार्मिक स्थळे हटविण्याची कारवाई करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त सार्वजनिक रस्त्यांवर रहदारीस अडथळा होईल अशा प्रकारे फेरीवाले/हॉकर्स यांनी व्यवसाय केल्यास, अतिक्रमण निर्मूलन मोहिमेत त्यांचेवर कार्यवाही करण्यात येत आहे.

प्रकल्प कक्ष :

शहर विकासाचे नियोजन करणेच्या दृष्टीने, झोपडपट्टीमुक्त शहराचा विकास साधण्यासाठी घरकुल योजनांच्या माध्यमातून शहरी गरिबांचा राहणीमानाचा दर्जा उंचावण्याचा हेतू साध्य करण्याचा प्रयत्न करणेत येत आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांकरीता रमाई आवास घरकुल योजनेंतर्गत महापालिका क्षेत्रातील दारिद्ररेषेखालील अनुसूचित जाती व नवबौद्धांना लाभ देण्यात येत आहे. स्वमालकीची झोपडी, कच्चे घर, मोकळी जागा असणा-या लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व दुरुस्तीसाठी रु. २.५० लक्ष अनुदान देण्यात येत आहे.

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत शहरी गरिबांना मुलभूत सुविधा (बीएसयुपी) पुरविण्याच्या योजनेत पात्र झोपडीधारकास शासकीय इमारतीमध्ये २६९ स्क्वेअरफूट क्षेत्रफळाची सदनिका दिली जात आहे. शहरातील शिवाजीवाडी, वडाळा, चुंचाळे, साम्राटनगर, शिवनगर, भीमवाडी, संजयनगर मजूरवाडी, निलगीरीबाग, गीताईनगर, साई पॅलेस, सामनगाव, गांधीधाम या ठिकाणी ७,४६० घरकुले बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सर्वांसाठी घरे-२०२२ या संकल्पनेनुसार, झोपडपट्यांचा त्याच ठिकाणी पुनर्विकास करणे येत आहे. तसेच कर्ज संलग्न व्याज अनुदानातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणा-या घरांची निर्मिती करणेत येत आहे. खाजगी भागीदारीतून सदर घरांची निर्मिती करुन, लाभार्थ्यांना वैयक्तिक घरकूल बांधण्यास अनुदान देण्यात येत आहे. नाशिक मनपा क्षेत्रातील झोपडपट्टी सर्वेक्षणानुसार, १५९ झोपडपट्टी क्षेत्रांमध्ये ५५,५२० कुटुंबातील १,९२,९५९ लोकसंख्याच्या ४१,४०७ झोपडया आढळून आलेल्या आहेत.

राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत दीनदयाळ अंत्योदय योजनेत (DAY-NULM) दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जाती, जमाती, महिला, अल्पसंख्यांक, दिव्यांग लाभार्थांना लाभ देण्यात येतो. सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणीच्या दृष्टीने नोंदणीकृत स्वयंसहाय्यता

बचतगट वस्तीतर संघ व शहरस्तर संघ स्थापन करण्यात येऊन, अभियानाच्या माध्यमातून निर्माण झालेल्या सेवा व उत्पादित मालाला बाजारपेठ मिळवून देण्यात येते. तसेच कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन, शहरी गरीबांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली जाते. त्याचप्रमाणे शहरी बेघरांना निवारा, फेरीवाल्यांना सहाय्य तसेच क्षमता बांधणी व प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली जात आहे.

राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार महानगरपालिका क्षेत्रातील बायोमेट्रिक नोंदणी केलेल्या 9,620 फेरीवाल्यांना नोंदणी प्रमाणपत्र/ओळखपत्र दिले जाणार आहे. शहरात निर्माण केलेल्या 225 फेरीवाला क्षेत्रांमध्ये फेरीवाल्यांना विवक्षीत जागा नेमून देऊन, त्यांचेकडून दैनंदिन ऑनलाईन लायसेन्स फी वसूल करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत 132 फेरिवाला क्षेत्रांमध्ये 3,372 फेरीवाल्यांना बसविण्यात येऊन, उर्वरीत फेरीवाला क्षेत्र निश्चितीचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच फेरीवाला क्षेत्रामध्ये पाणी, स्वच्छतागृह, विदयुतव्यवस्था, जागा सपाटीकरण अशा सुविधा देण्यात येत आहे.

<u>मिळकती, जाहिरात व परवाने :-</u>

महापालिका मिळकतींचे सर्वेक्षण करुन सर्व मिळकतींच्या अद्ययावत माहितीचे संगणकीकरण करण्यात आले आहे. तसेच नव्याने निर्माण होणा-या मिळकतींची संगणकीय नोंद घेण्यात येत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदींन्वये, बाजार मूल्यापेक्षा कमी भाडेपट्टयाच्या अथवा करारनामा संपलेल्या मिळकती ताब्यात घेण्यात येत आहेत. शहरातील विविध जाहिरात ठिकाणांसाठी निविदा प्रक्रीया राबविण्यात येत आहे. व्यावसायिकांना परवाने देण्याची प्रक्रिया पारदर्शी व सुलभ करण्यासाठी, संगणकिय ऑनलाईन परवाना सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

महाकवी कालिदास कलामंदिर व महात्मा फुले कलादालन यांचे नूतनीकरण करण्यात येऊन अत्याधुनिक ध्वनीव्यवस्था, सीसीटिव्ही कॅमेरे, विदयुतीकरण, वातानुकूलित यंत्रणा व सुसज्ज आरामदायक आसनव्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच ऑनलाईन बुकिंगची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे. चित्रपट महर्षि दादासाहेब फाळके स्मारक व यशवंतराव चव्हाण तारांगण/विज्ञान केंद्र यांचे नूतनीकरण तथा देखभाल दुरुस्ती सार्वजनिक-खाजगी सहभाग तत्वावर (PPP) विकसित करण्यात येत आहे. तसेच बाहययंत्रणेव्दारे जलतरण तलावांची देखभाल व दुरुस्ती करण्याचे विचाराधीन आहे.

<u>परिवहन सेवा :</u>

